MAH/NAN/10936/2015
ISSN 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor 7.479

आजादी का अमृत महोत्सव

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LV, 28 March 2022

शासकिय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.


संलग्नित

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या द्वारा आयोजित

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिसंवाद (ऑनलाईन)

## मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा



* प्रमुख संपादक *

प्राचार्य डॉ. उर्मिला धूत

* संपादक *

प्रो.डॉ. शैला सारंग

* सह संपादक *

प्रो.डॉ. वनिता रामटेके

PRINCIPAL
Shivaji College, HINGO

ISSN:2454 – 7905

*SJIF Impact Factor 2022: 7.479*

# Worldwide International Inter DisciplinaryResearchJournal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol.I ISSUE – LV Year – 7 28 March 2022

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित

शासकीय अध्यापक महाविद्यालय नांदेड अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष द्वारा आयोजित

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिसंवाद ऑनलाईन

## मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा

प्रमुख संपादक

**प्राचार्य डॉ. उर्मिला धूत**

संपादक

**प्रो. डॉ. शैला सारंग**

सह संपादक

**प्रो. डॉ. वनिता रामटेके**

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)Email:Shrishprakashan2009@gmil.com

**Director :Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence :** House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,Taroda (KH), Nanded – 431605(India -Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com ; umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067 **Website:** www.wiidrj.com



PRINCIPAL
Shivaji College, HINGO

| | | | |
|---|---|---|---|
| 43. | वारली लोकगीतांतून अभिव्यक्त झालेली स्त्रीप्रतिमा | डॉ. गीता जाधव | 197 |
| 44. | राजकवी भा.रा.तांबे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा | डॉ. महालक्ष्मी मोराळे | 201 |
| 45. | "मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा" | अक्षय बालाजी रत्नपारखे | 206 |
| 46. | आसाराम लोमटे यांच्या कथांतील स्त्री प्रतिमा | संजय नामदेवराव आठवले<br>प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे | 211 |
| 47. | मध्ययुगीन साहित्यातील स्त्री जाणिवा | गोविंद शंकरराव रामदिनेवार | 215 |
| 48. | स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा | प्रा. आहेर डी. के. | 217 |
| 49. | मराठी कथा कादंबऱ्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | श्रीमती रतन अंबादास कराड | 222 |
| 50. | मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | प्रा. निखिता वासू गावकर | 226 |
| 51. | मराठी कवितेतील स्त्री आत्मवेदना | प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | 228 |
| 52. | मराठी आदिवासी कादंबरीतील स्त्री जाणीव | प्रा. नवनाथ निवृत्ती बेंडे | 232 |
| 53. | मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | श्रीमती चंद्रकला सटवाजी कोलगाने | 236 |
| 54. | वा .म .जोशी लिखित मराठी कादंबरीतील स्त्री प्रतिमा | प्रा. राजकुमार मोरे | 239 |
| 55. | महापुरूषांच्या मराठी लेखन साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | अशोक चापटे<br>डॉ. भागिरथी गिरी | 244 |
| 56. | 'जावे तिच्या वंशा' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा | श्रीमती. दुर्गा सुदिन जांभळे | 250 |
| 57. | मराठी दलित स्वकथनांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा: | प्रा. डॉ. रेखा वाडेकर | 254 |
| 58. | साठोत्तरी दलित साहित्य प्रवाहातूनव्यक्त झालेला स्त्रीवाद | डॉ. विजया खामनकर | 259 |
| 59. | स्त्री सक्षमीकरण ( कविता ) | सौ. सागर गोविंदराव पांचाळ | 262 |




PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

# मराठी कवितेतील स्त्री आत्मवेदना

प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदीवासी, स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची निर्मिती झाली. हे प्रवाह उत्तरोउत्तर अधिकच विकसित झाले. प्रत्येक प्रवाहातील साहित्याच्याप्रकारात जिवंत कसदार असे लेखनझालेआहे. साहित्यातून सामाजिक सांस्कृतिक धार्मिक राजकीय अशा विविध अंगाने साहित्य लेखन झाले. कवितेसारखा भावनात्मकता प्रगट करणारा लेखन प्रकार ही मोठ्या प्रचंड प्रमाणात निर्माण झालाआहे.

स्त्रीवादी साहित्यात स्त्रीचे भावविश्व साहित्यातून प्रतिबिंबित झाले. आहे. कुटूंब, समाज, संस्कृतीच्या माध्यमातूनस्त्रीचे शोषण झाल्याची खंत स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त झाली आहे. स्त्रीयांनी आपल्या साहित्यातून मनातील विचाराला दुःखाला अन्याय –अत्याचाराला त्याच बरोबर आपल्यातील क्षमतांना मोकळी वाट करून दिलेली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्याप्रमाणे म्हणतात, ठोठवा म्हणजे उघडेल, मागा म्हणजे मिळेल त्याचप्रमाणे, स्त्रियांनी आपल्या जीवनपटातील खाचखळगे, स्वानुभव साहित्यातून उलगडलेले आहेत, त्यात जास्तीत जास्त वेदनानुभवच असल्याचे सिद्ध होते.कविता या साहित्य प्रकाराचा त्यांनी वापर केलाकवितेचा जन्म कसा होतो, हे सांगताना वैशालीपाटील म्हणते

"होतो मनाचा आक्रोश, बाई तरी मी सोसते
माझ्या बोटांच्या पेराला, फूल कवितेचे येते..."१

जीवनातील दुःख सोसताना मनात निर्माण झालेल्या अशांती मुळे उत्स्फूर्तपणे कवितेचा जन्म होतो. ते शब्द लिहिण्यासाठी बोटाचीमदतहोते.कविता हा स्त्रीमनाचा विसावा असल्याने त्यांनी आपल्या मनातील दुःख, वेदना यांना कवितेतून वाट करून दिलेलीअसल्याचे स्पष्ट होते. पूर्वीच्या काळी निरक्षर स्त्रियांनी ओवीगीताचा वापरही केलेला आहे.जसे

"लेकीचा जन्म, नको घालू देवादत्ता।
संसारी येऊन, परायाचीसत्ता।।"
लेकीचा जन्म कुण्या घातला वेड्यानं।
पराया घरी बैल राबतो भाड्यानं।।"२

जणू घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे त्यांना कष्ट सोसावे लागतात. आपल्या जन्मावर पुरूषांचीच मालकी असते हे मनातील दुःख यातून स्पष्ट होते.

अश्विनी धोंगडे बाईचा जन्म मिळाल्याबद्दल दुःख व्यक्त करताना लिहितात,

"बरे झाले देवा । केलासी उपकार ।
घातलेस जन्मा । बाईच्या ह्या ।
न कळे कोणा । अर्थ बोलण्याचा ।
भाषेनेही मुके । केले आम्हा ।।"३

स्त्रीनीआपलीबाजू कितीही तळमळीने मांडली, आपल्या दुःखाचा पट कुणापुढेही उलगडला तरी त्याच्यातील तथ्य, वेदना, वास्तव, आर्त किंकाळया कोणालाही उलगडत नाहीत. तसेच ह्या वेदना मुखातून व्यक्त करण्यास आणि त्या लिपीकबद्ध करण्यासही मुभा नाही. मग मनातच त्यांना साठवायचे व कुढत बसायचे. येथे भाषाही कमी पडते. कारण सगळेच स्वानुभव भाषेतून मांडता येत नाहीत.

तसेच अनुराधा पाटील लिहितात,

"ती वयात येत ,तेव्हाच संपून जाते



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

उंच उचं झोके, अन् सागर गोटे

मागील दारी , अन् पुढ्यात

भरजरी साडी , पुढील आयुष्याला लक्तरांचे

आमंत्रण म्हणून...."४

स्त्री जेव्हा वयातयेते. तेव्हाच तिच्या आयुष्यात दुःखाचा प्रवेश होतो. तिचे स्वातंत्र्य संपून पारतंत्र्यातील जीवनाला सुरूवात होते. तिचे स्थान मागील दारात आणि भरजरी साडीच्या ओझ्यात ती गुरफटली जाते. म्हणजेच पुढील आयुष्य हे लक्तरांसारखे आहे याचीच ही जणू सुरूवातच असते.

स्त्रीला गृहीत धरण्याची पुरूषीप्रवृत्ती युगानुयुगाची आहे. यामध्ये ती माणूस आहे, तिलाही भावना, मन आहे. ह्याचा विचार केला जात नाही. म्हणूनच ती म्हणते,

"चाळीशी उलटली तरी,त्यांच्या लक्षात आले नाहीत

स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे ,आपण बोललले यांच्या रक्तात मिसळायला

काही वर्षे जावी लागतील,आणि कृतीत कधी उतरेल

ते तर सांगताच येणार नाही आता तरी "५

स्त्री म्हणजे एक यंत्रच आहे. स्त्रीच्या मनाचा, भावनांचा, क्षमतांचा, गुणांचा विचार करण्याची जणू गरजचनाही, ती ही एक सजीव घटक आहे, तिलाही थोडी मोकळीक हवी, तिलाही भावनीक, मानसिक आधार लागतो. या गोष्टीचा सर्वांना विसर पडलेला दिसून येतो. लग्न, संसार, मुलेबाळे, रांधा, वाढा-उष्टीकाढा, रात्रीची गरज एवढ्यापुरतीच स्त्रीचीगरज म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. अनेक वर्षे संसार केला जातो. मात्र, स्त्रीला ओळखले गेलेले नाही. लग्नात जे-जे मंत्र-तंत्र म्हटले, एकमेकांच्या बरोबरीने संसार करण्याचे निश्चय केले. स्त्रीच या गोष्टींना बांधील ठरली. पुरूषांनी मात्र यातून केव्हाच फारकत घेतली. आणखी किती काळ स्त्रीला या गोष्टी सोसाव्या लागणार. हे स्त्री जीवन कवितेतून व्यक्त होताना दिसते.

जीवनात जाणवणारी उणीव येथे रजनी परुळेकर व्यक्त करतात. कुटुंब म्हणजेच संस्कृतीच एक | अभिन्न अंग मात्र या कुटुंबाच्या चुकीच्याच कल्पना फक्त समाजाने अंगीकारल्या व निखळ सत्त्व, त्यातील आदर्शवादी विचारधारा मागे पडली. याचा परिणाम स्त्री जीवनावर झाला तेच मांडताना कवयित्री रजनी परुळेकर लिहितात,

"मी समाजाच्या दृष्टीने लग्नाची बायको

प्रतिष्ठित, पण खरं तर एका वेश्याच

मात्र एकाच पुरुषाची"६

स्त्री जीवनात कुटुंब, लग्न, संसार या खरोखरच उदात्त संकल्पना आहेत. मात्र तीचे अवमूल्यन झालेले आहे. स्त्रीला लग्नाच्या संस्कारातून जणू बांधून टाकलं जातं आणि सुरू होते ते एका वेश्याचच जीवन. जिथं रोजच या शरीरावर जणू बलात्कारच होतो. मन मारून स्त्रीने रहावे, दाद मागणार कोणाला? जणू जीवनभराचाच हा वेश्याव्यवसायाचा सौदा केल्याप्रमाणे जीवन वाट्याला येते. बाहेर वेश्या स्त्रियांच्या नशिबात नवनवीन पुरूष मात्र ह्या घरातील वेश्येच्या नशिबात तोच पुरुष फरक फक्त थोडा आहे. जीवन, यातना, भावना मात्र त्याच आहेत. ज्या कधीच मेलेल्या आहेत. पुन्हा कधीही जीवंत न होण्यासाठीच. अशी खंत, व्यथा, वेदना ही स्त्री व्यक् करते.

संत कान्होपात्रा-एका गणिकेची मुलगी म्हणून समाजाने तिला नाकारले. तिच्या आईने राजघराण्यातल्या पुरूषाशी संधान जुळविण्याची तयारी केली तेव्हा ती नकार देते. बादशहाचे शिपाई तिला जबरीने नेण्यासाठी येतात ती टाहो फोडते,

"नको देवराया अंत आता पाहू ।

प्राण हा सर्वथा, फुटो पाहे ।।७

अशा घातक प्रथेला बळी पडलेल्या स्त्रीचा हा टाहो व्यक्त होतो. देवाला शरण जाते. माझा अंत पाहू नको, मला यातून सोडव असे ती आर्ततेने करुणा भाकू लागते. माझ्या शरीरातून प्राण निघून चाललेला आहे. अशा शब्दात ती विठ्ठलाचा धावा करते. संत कान्होपात्राच्या दुःखाला तर सीमाच नाही असे दिसून येते.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

संत बहिणाबाई ही आपल्या मनातील स्त्रीदेह, स्त्रीजन्म याबाबत उदासिनता दर्शवितात. त्याबद्दल त्यांच्या मनात दुःख असल्याचे जाणवते. त्या लिहितात,

"स्त्रियेचे शरीर पराधीन देह । नचलावे उपाय विरक्तीचा ।।
पडिले अंतर विबकाचे बळ । काय निर्मियले राघोबाने ।।"८

स्त्रीचा कुमार वयात वडील, तारूण्यात पती आणि वृद्धावस्थेत मुलगा अशा पद्धतीने सांभाळ केला जातो. तिचे संरक्षण केले जाते जणू ती म्हणजे अकार्यक्षम, अबला, स्वतःचे संरक्षण न करू शकणारी आहे. अशी समाजाची धारणा झालेली दिसून येते. असे असले तरी खरोखरच स्त्रीला आपण पारतंत्र्यात असल्याचे जाणवते.

आपल्या देहावर पूर्णपणे दुसऱ्याचाअधिकार आहे. त्यातून विरक्त हस्त्रीकडे पाहताना लिंगाधिष्ठीत तेच्या दृष्टीकोनातून पाहिले जाते. त्यामुळे स्त्रीचे मन दुःखी, होते.

स्त्रीला देवाची भक्ती करण्याचा अधिकारही डावलला गेला होता. कारण तिला अपवित्र चंचला, कपटी, पापाचे आगार, पुरूषाला मोहिनी घालणारी अशाखुळचट, ज्याला कसलाही आधार नाही अशा दुर्गणांशी बांधले गेलेले होते. हीच खंत वेणाबाई व्यक्त करतात ती अशी

"कोणी निंदिती, कोणी वंदिती
वास मी त्यांची पाही ना ।।९

वेणाबाईनाही अशा निंदेला सामोरे जावे लागले. त्याच्यावर स्त्री म्हणून परमेश्वराची सेवा, नामस्मरण करण्यावर बंधने आली होती.

स्त्रीचे स्त्री म्हणून जे अनुभव असतात. त्याचा अनुभव, कल्पना पुरुषाला मुळीच येत नाही. त्यामुळे त्यातील अनुभव हे तिचे स्व चे अनुभव असतात. अशा अनुभवातील वेदना नीरजा काव्यातून व्यक्त करतात.

"रजस्वःला, संभोग, बाळंतपण, शरीराभोवती फिरलेलं
आयुष्यासकट माणसाचं चक्र, मुक्या वेदनाचं वेटोळं.."१०

स्त्री रजस्वला असताना तिला येणारे अनुभव हे बऱ्याच वेळा दुःखद असतात. पूर्वीपासन तो कालावधी हा अपवित्र म्हटला जातो. त्याचप्रम संभोगाचे अनुभव त्यातील दाहकता बऱ्याच वेळा बळजबरीने होणारा बलात्कार यातूनही तिच्या शरीरवमनाला वेदनाच सहन कराव्या लागतात. बाळंतपण स्त्रीच्या जन्म मरणाचीच वेळ म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अनुराधा पाटील यांच्या कवितेतून स्त्रीवेदन उलगडते. त्या लिहितात,

"रहा उभी तू तुझ्याच चितेवर
आयुष्याचे पुरवीत इंधन..'११

ही स्त्री खरोखरच दिवसागणीक आपल्याच चितेवर जळत असते. याचे तिळमात्रही दुःख समाजालामुळीच होत नाही. प्राचीन कालापासूनकितीतरीस्त्रियासतीगेल्या. त्यांचा शारीरिक-मानसिकछळझाला. ही स्त्री दुःखाची चिता आजही विझायला तयार नाही, प्रत्येक स्त्री त्या चितेचा बळी ठरत आहे.

कवयित्रीललिता गादगे लिहीतात,

"बाई म्हंजी कणकीचा गोळा
मदी ठिवावा उंदीर टोकन त्यात
भाईर ठिवावा तर कावळं"१२

स्त्रीच्या शोषणासाठी घरात आणि बाहेरही कावळे, गिधाडे टपून असतात. एवढे जपून तिला वागावे लागते. हीस्त्रीवेदनाआहे.

निष्कर्ष:-

स्त्रियांनी कवितातून स्त्री जन्मच नको. अशी आत्मवेदना प्रकट केली आहे. जीवनातील दुःखाचे सर्वात मूळ कारण असेल तरस्त्री जन्म आहे. पुरुषसत्ताक कुटूंब पद्धतीमध्ये स्त्रीला स्वातंत्र्याने जीवन जगण्याचा अधिकारच ठेवला नाही. स्त्री म्हणून जन्म झाला तेव्हा पासून समाजाचा पाहण्याचा दुष्टीकोणवाईट आहे. कुटूंब,समाज व्यवस्थेने तिला हीन दर्जा दिला आहे.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

धर्मव्यवस्थेने तिला मानसिक गुलाम बनविले आहे. तिच्यावर अन्यायकारक बंधनेलादली. तिची कोणतीही चूक नसताना तिला दंड दिला जातो.अतिशूद्रापेक्षाही तिची अवस्था दयनीय करण्यात आलीआहे.स्त्रीलावडिलांच्या पतीच्या मुलांच्याअधिकाराखालीजीवनजगावेलागते.

तिलारूढी, प्रथा आणिपरंपरेच्या दुष्टचक्रात अडकविण्यात आले. तिच्यारजस्व, संभोग, बाळंतपण या नैसर्गिक अडचणीच्याकाळातहीवेदनादिल्याजातात.स्त्रित्वाचदुःख तिच्या आत्मवेदनेतून व्यक्त झालेले दिसते.

पुरूषीवृती, कुटूंब पध्दती, समाजव्यवस्था,धर्म संस्था, संस्कृती या सर्वांनी लादलेली बंधने स्त्री जीवनातून वजा केली. आणि पुरुषासम स्त्रीला अधिकार दिला गेला तर तिच्या आत्मवेदना कमी होतील.

संदर्भ : -


१) वैशालीपाटील: सुखाचेपापुद्रे ,अभिनंदन प्रकाशन, मंगळवार पेठ, कोल्हापूर प्रथमावृत्ती २४ डिसेंबर २०२०पृ.१६

२) संकलितओवीगित.

३) जाधव रा.ग., आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८६, पृ.८७

४) सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता,पृ.२१७

५) नीरजा (संपा), निद्राहीन रात्रीच्या कठोर कातळावर निवडक रजनी परुळेकर, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, २०११, (प्रस्तावनापृ. ३१)

६) तत्रैव, उ.नि.पू. (प्रस्तावना पृ.३१)

७) भवाळकर तारा, स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, २०१२, पृ.६९

८) तत्रैव, उ.नि. पृ.७१

९) तत्रैव, उ.नि. पृ.११२

१०) जाधव रा.ग., आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८६, पृ.५०

११) तत्रैव, उ.नि. पृ.८४

१२) पाडगावकर कांचन, मराठवाड्यातील कवयित्रींची कविता, रुपवेध प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती, २००७, पृ.८६


PRINCIPAL
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.